आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ जुलै २०२४ - शनिवार

<u>ठळक बातम्या</u>

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत येणार ५२ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं करणार भूमिपूजन आणि लोकार्पण
- नीति आयोगाचा २०२३-२०२४ साठीचा SDG इंडिया इंडेक्स अर्थात शाश्वत विकास उदिष्ट निर्देशांक जारी
- सात राज्यांमधल्या तेरा विधानसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीसाठीची मतमोजणी सुरू

आणि

- भारत आणि झिम्बाब्वे टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज हरारे इथं रंगणार

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत येणार असून त्यांच्या हस्ते ५२हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण होणार आहे. गोरेगाव इथल्या नेस्को प्रदर्शन केंद्रात रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित २९ हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होईल. गोरेगाव- मुलुंड रस्त्यावरचा जुळा बोगदा, ठाणे - बोरिवली दरम्यानचा बोगदा तसंच, नवी मुंबईत तुर्भे इथं कल्याण यार्ड रिमॉडेलिंग आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर प्रधानमंत्री लोकमान्य टिळक टर्मिनसवरच्या नवीन फलाटाचं लोकार्पण करतील. मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेचं उद्घाटन देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार असून संध्याकाळी ते इंडीयन न्यूजपेपर सोसायटीच्या नव्या इमारतीचं उद्घाटन करतील.

<><><><><>

नीति आयोगानं काल २०२३-२०२४ साठीचा SDG इंडिया इंडेक्स अर्थात शाश्वत विकास उदिष्ट निर्देशांक जारी केला. नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी आधिकारी बीव्हीआर सुब्रह्मण्यम आणि नीतिआयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्देशांक जारी करण्यात आला. जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असूनही भारत शाश्वत विकास उद्दिष्टांकडे प्रगती करत आहे, २०१८ मध्ये ५७ आणि २०२०-२१ मध्ये ६६ वरून हा निर्देशांक २०२३-२४ मध्ये ७१वर गेला आहे. देशातली सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची प्रगती मोजण्यासाठी हा निर्देशांक वापरला जातो.

<><><><><>

प्राप्तिकर विभागानं २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ६ लाख ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक प्रत्यक्ष कर संकलन केलं आहे तसचं या महिन्याच्या ११ तारखेपर्यंत ७० हजार ९०२ कोटी रुपयांचा परतावा जारी केला आहे. एकूण संकलनात २ लाख ६५ हजार ३३६ कोटी रुपये कॉर्पोरेट कर, ३ लाख ६१ हजार ८६२ कोटी रुपये वैयक्तिक प्राप्तिकर आणि १ हजार ४२६ कोटी रुपये इतर करांचा समावेश असल्याचं प्राप्तिकर विभागानं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. निव्वळ ५ लाख ७४ हजार ३५७ कोटी रुपये जमा झाल्याचं आकडेवारीत नमूद करण्यात आलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात कांदा कापूस आणि सोयाबीन मधील दरांच्या चढउतारांनी त्रास झालेल्या शेतकऱ्यांना लवकरच दिलासा देण्याचं आश्वासन केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना दिलं आहे. पाशा पटेल यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. वाणिज्य

मंत्र्यांबरोबर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घडवून आणलेल्या भेटीमध्ये हे आश्वासन दिल्याचंही पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

इस्रायलवर ७ ऑक्टोबर २०२३ ला झालेल्या हल्ल्यातल्या मुख्य सूत्रधारांपैकी एक असणारा हमासचा वरिष्ठ कमांडर इस्रायलच्या हवाई हल्ल्यात मारला गेला. अयमन शोदेह असं या कमांडरचं नाव असून तो शाजया बटालियनचा डेप्यूटी कमांडर होता अशी माहिती इस्रायलच्या संरक्षण दलाच्या अधिकाऱ्याने दिली आहे. दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या दीडशे जणांमध्ये त्याचा समावेश होता असं ही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नेपाळमधे पुष्पकमल दहल प्रचंड यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने बहुमत गमावल्यानंतर विरोधी पक्ष नेते के. पी. शर्मा ओली यांनी सरकार स्थापनेचा दावा केला आहे. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांची काल रात्री उशिरा भेट घेऊन ओली यांनी नेपाळ काँग्रेस आणि इतर लहान पक्षांचा पाठिंबा अपल्याला असल्याचा दावा सादर केला. येत्या ३ दिवसात त्यांना सरकार स्थापन करायचं आहे. २७५ सदस्यांच्या नेपाळ संसदेत नेपाळ काँग्रेसचे ८९, एमालेचे ७८ आणि राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टीचे १४ सदस्य आहेत.

<><><><><>

प्रसार भारती आणि आयआयटी दिल्ली यांच्यावतीनं आजपासून दिल्लीतल्या त्यागराज स्टेडियमवर 'DD-Robocon' India २०२४ चं आयोजन करण्यात आलं आहे. या दोन दिवसीय स्पर्धेत देशातली ४५ हून अधिक महाविद्यालयं, विद्यापीठ आणि इतर शैक्षणिक संस्थांमधले साडेसातशेहून अधिक विद्यार्थी सहभागी होत आहेत.डीडी-रोबोकॉनमधील विजेता संघ व्हिएतनाममधील

क्वांगनिन्ह इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय एशिया-पॅसिफिक ब्रॉडकास्टिंग युनियन रोबोकॉन २०२४ मध्ये भारताचं प्रतिनिधित्व करेल.

<><><><><>

सात राज्यांमधल्या तेरा विधानसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीसाठीची मतमोजणी आज सुरू आहे. १० जुलै रोजी या निवडणुकीसाठी मतदान झालं होतं. पंजाबमधल्या जालंधर पश्चिम मतदारसंघाचा निकाल घोषित झाला असून इथं आम आदमी पार्टीचे मोहिंदर भगत हे विजयी झाले आहेत. तर हिमाचल प्रदेशमधल्या देहरा मतदारसंघात काँग्रेसचे कमलेश ठाकुर जिंकले आहेत.

इतर मतदारसंघांचे कल स्पष्ट झाले असून पश्चिम बंगालमधल्या रायगंज, राणाघाट दक्षिण, बागडा आणि मणिकताल या चारही मतदारसंघात तृणमूल काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत. उत्तराखंडमधल्या मंगलौर आणि बद्रीनाथ तसंच मध्य प्रदेशच्या अमरवाडामध्ये काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत. तमिळनाडूमधल्या विक्रवंडी मध्ये द्रमुक, बिहारच्या रुपौली मतदारसंघात अपक्ष उमेदवार शंकर सिंह आघाडीवर आहेत. तर हिमाचलप्रदेशच्या नलगढ मध्ये काँग्रेस आणि हमीरपूरमध्ये भाजपाचा उमेदवार आघाडीवर आहे.

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभेच्या अखेरच्या अधिवेशनचा काल शेवटचा दिवस होता. या अधिवेशन काळात झालेल्या कामकाजाचा आढावा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहासमोर मांडला.

या अधिवेशन काळात एकूण १३ बैठकीत ९१ तास २ मिनिटं कामकाज झालं. तर अधिवेशनाचा तीन तास १९ मिनिटं वेळ वाया गेला. या अधिवेशन काळात ३३७ तारांकित प्रश्न स्वीकृत केले गेले, यातल्या ३२ प्रश्नांना मंत्र्यांनी उत्तरं दिली. १३१ अशासकीय ठरावांच्या सूचना मान्य करण्यात आल्या, तर एक शासकीय ठराव

मांडण्यात आला. अधिवेशन काळात आठ शासकीय विधेयकं संमत करण्यात आली. विधानसभा सदस्यांची या सत्रातली उपस्थिती ६७ टक्क्यापेक्षा जास्त राहिली.

-<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेत अधिवेशन काळात झालेल्या कामकाजाचा आढावा उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी काल सभागृहासमोर मांडला. या अधिवेशन काळात एकूण १३ बैठकीत ६० तास २६ मिनिटं कामकाज झालं. तर दहा मिनिटं वेळ वाया गेला. ४२८ तारांकित प्रश्न स्वीकृत केले गेले, यातल्या ५५ प्रश्नांना मंत्र्यांनी उत्तरं दिली. अधिवेशन काळात विधानपरिषदेत दोन अध्यादेश पटलावर ठेवण्यात आले, तर तीन शासकीय विधेयकं संमत करण्यात आली. कामकाजाच्या काळात सदस्यांची उपस्थिती ७७ टक्के इतकी राहिली.

<><><><><>

क्रिकेटमध्ये भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात सुरू असलेल्या टी ट्वेंटी मालिकेतला चौथा सामना आज हरारे मध्ये संध्याकाळी साडेचार वाजता होणार आहे. या मालिकेत भारत २-१ ने आघाडीवर आहे. मालिकेतल्या पहिल्याच सामन्यात पराभव पत्करावा लागल्यानंतर भारतीय संघाने जोरदार पुनरागमन करत पुढच्या दोन्ही सामन्यात झिम्बाब्वेला पराभूत केलं. आजचा सामना दोन्ही संघांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. दरम्यान, मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना उद्या होणार आहे.

<><><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज संध्याकाळी महिला एकेरीच्या अंतिम फेरीत ७व्या मानांकित जास्मिन पाओलिनीची लढत ३१व्या मानांकित बार्बोरा क्रेजिकोव्हाशी होणार आहे. चेक प्रजासत्ताकच्या क्रेजिकोव्हानं गुरुवारी उपांत्य फेरीत कझाकस्तानच्या एलेना रायबाकिना हिच्यावर विजय मिळवून विम्बल्डनच्या पहिल्याच अंतिम फेरीत प्रवेश केला. इटलीच्या पाओलिनीनं उपांत्य फेरीत

क्रोएशियाच्या डोना वेकिकचा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केलं आहे.

पुरुष एकेरीचा अंतिम सामना उद्या नोव्हाक जोकोविच आणि गतविजेता कार्लोस अल्काराझ यांच्यात होणार आहे. सर्बियाच्या जोकोविचनं काल रात्री झालेल्या उपांत्य फेरीत इटालियन लोरेन्झो मुसेट्टीविरुद्ध विजय मिळवला तर अल्काराझनं उपांत्य फेरीत रशियाच्या डॅनिल मेदवेदेवचा पराभव करून स्पर्धेतील सलग दुसरी अंतिम फेरी गाठली.

पुरुष दुहेरीच्या विजेतेपदाच्या लढतीत हेन्री पॅटन आणि हॅरी हेलिओवारा या ब्रिटिश-फिनिश जोडीचा सामना आज संध्याकाळी मॅक्स पर्सेल आणि जॉर्डन थॉम्पसन या ऑस्ट्रेलियन जोडीशी होणार आहे.

महिला दुहेरीत कॅनडाची गॅब्रिएला डब्रोव्स्की आणि न्यूझीलंडची एरिन राउटलिफ या जोडीचा सामना आज रात्री अंतिम फेरीत चेक प्रजासत्ताकच्या कॅटेरिना सिनियाकोवा आणि अमेरिकेच्या टेलर टाउनसेंड यांच्याशी होणार आहे.
मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत उद्या पोलिश तैवान जोडी जॅन झिलिंस्की, हसिह सु-वेई आणि मेक्सिकन जोडी सँटियागो गोन्झालेझ, जिउलियाना ओल्मोस यांच्यात लढत होणार आहे.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं पुढील ३ दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा, रायलसीमा, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

हवामान विभागानं उद्यापर्यंत आसाम, मेघालय, ओडिशा, पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, उत्तराखंड, पूर्व आणि पश्चिम उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेशात तर राजस्थान, झारखंड, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, अंदमान आणि निकोबार बेटे, नागालँड आणि मणिपूरच्या काही भागात आज आणि उद्या मुसळधार पाऊस

पडण्याची शक्यता वर्तवली आहे. आंध्र प्रदेश किनीरपट्टी, तेलंगणा, मराठवाडा आणि तामिळनाडू इथं पुढील ५ दिवस हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//